**दिन विशेष...**

१५२४ : पोर्तुगीज खलाशी व भारताचा शोध लावणारा दर्यावर्दी वास्को-द-गामा यांचा मृत्यू झाला.

१८९९ : साने गुरुजी यांचा जन्मदिन.

१८१८ : शक्तीच्या अविनाशित्वाचा शोध लावणारा संशोधक जेम्स प्रिस्कॉट ज्यूल यांचा जन्म झाला.

# शौर्य मराठी

महाराष्ट्राचे निडर दैनिक

RNI-MAHMAR/2023/89125

सेन्सेक्स ८५,५२४.८४ -४२.६३ (०.०५०%)

डॉलर ₹ ८९.६०

आजचे तापमान (डिग्री सेल्सिअस)

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| जळगाव | ३० | १३ |
| दिल्ली | २१ | ११ |
| मुंबई | ३४ | १८ |
| नागपूर | २८ | ११ |
| पुणे | ३० | १० |

epaper.shauryamarathi.com | जळगाव, धुळे, नंदुरबार | शनिवार, दि. २७ डिसेंबर २०२५ | वर्ष २ रे | अंक ४८ किंमत : ५ रु. | पाने ४

**सुविचार**

यशस्वी होण्यासाठी आत्मशिस्त आणि नियमितता महत्त्वाची आहे.

सुर्योदय - सुर्यास्त
स.-७:०२ संध्या-५:५३

**सोने - चांदी**

सोने(१० ग्रॅम) - चांदी (प्रति किलो)
१,४०,४७५/- २,२३,०००/-

**केळी भाव**

नवती : ७५१ ते ७७०
पिल बाग : २५१ ते २७०
कांदे बाग : ----

# बांगलादेशातील हिंसाचाराकडे दुर्लक्ष करता येणार नाही!

## दूसऱ्या घटनेनंतर भारताकडून तीव्र निषेध व्यक्त

वृत्तसंस्था । नवी दिल्ली

**बांगलादेशमध्ये उसळलेल्या हिंसाचारात हिंदूंवर अत्याचार करण्यात येत आहेत. मागच्या आठवड्यात दोन हिंदू युवकांची हत्या करण्यात आली. या घटनांचा शुक्रवारी भारताकडून तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला. परराष्ट्र मंत्रालयाने घेतलेल्या पत्रकार परिषदेत बांगलादेशमध्ये अल्पसंख्याक समाजाविरुद्ध होत असलेल्या घटनांना अखंड शत्रुत्वाची संज्ञा दिली.**

मागच्या आठवड्यात राजधानी ढाकापासून १०० किमी अंतरावर असलेल्या मैमनसिंग येथे जमावाने ३० वर्षीय दीपू चंद्र दास नावाच्या कामगाराची हत्या केली होती. त्याला मारहाण करतानाचा व्हिडीओही व्हायरल झाला होता. दीपूचा नग्नावस्थेतील मृतदेह झाडाला बांधून आल लावण्यात आली होती. इतक्या क्रूर पद्धतीने हत्या करताना जमाव आनंद साजरा करताना दिसत होता.

परराष्ट्र मंत्रालयाच्या वतीने घेतलेल्या पत्रकार परिषदेत रणधीर जयस्वाल म्हणाले, 'बांगलादेशमध्ये हिंदू, ख्रिश्चन आणि बौद्धांसह अल्पसंख्याकांविरुद्ध सुरू असलेला हिंसाचार गंभीर चिंतेचा विषय आहे. मैमनसिंगमध्ये एका हिंदू तरूणाला अतिशय क्रूर पद्धतीने मारण्यात आले. या निर्घृण हत्येचा आम्ही निषेध करतो. या घटनेतील गुन्हेगारांना शिक्षा होईल, (पान २ वर)




### ● निष्पक्ष, मुक्त निवडणुकांना समर्थन : जयस्वाल

बांगलादेशातील लोकशाहीला पाठिंबा देत असताना रणधीर जयस्वाल पुढे म्हणाले, बांगलादेशमधील लोकांशी भारताचे घट्ट संबंध आहेत. बांगलादेशमध्ये स्थिरता आणि शांतात नांदावी, यासाठी आमचा पाठिंबा आहे. आम्ही बांगलादेशमधील निष्पक्ष, मुक्त निवडणुकांना समर्थन देतो. शांततेच्या वातावरणात निवडणुका पार पडाव्यात.

# महापालिका निवडणुकीत दोन दिवसांत युती

## ● उपमुख्यमंत्री शिंदे यांची माहिती

प्रतिनिधी । मुंबई



**महापालिका निवडणुकांसाठी शिवसेना आणि भाजपमध्ये सन्मानजनक युती होईल. एक ते दोन दिवसांत त्यास अंतिम स्वरुप दिले जाईल, असे उपमुख्यमंत्री शिंदे यांनी स्पष्ट केले. युती झाली पाहिजे असे स्पष्ट आदेश मुख्यमंत्री फडवणीस यांचे आहेत. ते प्रत्येक महापालिकेचा आढावा घेत आहेत, असेही शिंदे म्हणाले.**

ठाणे येथे शुक्रवारी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत प्रकाश महाजन यांनी शिंदे गटात पक्ष प्रवेश केला. त्यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी माध्यमांशी संवाद साधला. शिवसेना आणि भाजप विचारांची युती आहे. केंद्रात आणि महाराष्ट्रात महायुतीचे सरकार आहे. बाळासाहेबांची विचारधारा पुढे घेऊन जाण्याचे काम शिवसेना करत आहेत.

महाराष्ट्रात महापालिका निवडणुकांसाठी महायुतीच्या बैठका सुरू आहेत. महायुती म्हणून आम्ही निवडणूक लढविणार आहोत. युतीची चर्चा अंतिम टप्प्यात आहे. आमची युती सत्तेसाठी, खुर्चीसाठी, स्वार्थासाठी झालेले नाही. सध्या युत्या- आघाड्या होत आहेत. त्या फक्त खुर्ची, स्वार्थ आणि सत्ता यासाठी होत असल्याची टीका एकनाथ शिंदे यांनी ठाकरे गट आणि मनसेवर केली.

आगामी महापालिका निवडणुकीत बाळासाहेबांचे विचार आणि विकासाचा अजेंडा घेऊन लोकांसमोर जात आहोत. सन्मानजनक युती होणार असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे स्वतः दररोज त्याचा आढावा घेत आहेत. प्रत्येक महापालिकेतील पदाधिकाऱ्यांना (पान २ वर)

## महिला संघाचा श्रीलंकेवर एकतर्फी मालिका विजय




**विशाखापट्टनम ।** भारतीय महिला संघाने श्रीलंकेविरूद्धचा तिसरा सामना ८ विकेट्सने जिंकत एकतर्फी मालिका विजय नोंदवला आहे. तिसऱ्या सामन्यात भारताच्या गोलंदाजांसह शफाली वर्माने वादळी कामगिरी करत टीम इंडियाला विजय मिळवून दिला. शफाली वर्मा अर्धशतकी खेळी करत श्रीलंकेच्या संघाला एकटीच भारी पडली. यासह पाच सामन्यांची टी-२० मालिका टीम इंडियाने ३-० च्या फरकाने जिंकली आहे.

## विदर्भाच्या खेळाडूने रचला इतिहास!

**नागपूर ।** विजय हजारे ट्रॉफी २०२५-२६ मध्ये विदर्भ आणि हैदराबाद यांच्यात झालेल्या लढतीत विदर्भाने ८९ धावांनी शानदार विजय नोंदवला. या विजयापेक्षाही विदर्भाचा ३३ वर्षीय फलंदाज ध्रुव शौरी याने केलेल्या ऐतिहासिक कामगिरीची चर्चा सध्या क्रिकेट विश्वात रंगली आहे. ध्रुव शौरीने या सामन्यात १०९ धावांची खेळी करत 'लिस्ट ए' क्रिकेटमध्ये सलग ५ शतके झळकावण्याचा मोठा विश्वविक्रम प्रस्थापित केला आहे.

## नाशिकमध्ये आता 'स्वबळा'चा नारा?

**नाशिक ।** युतीसंदर्भात चर्चा सुरू असताना भाजपने मनसेचे प्रदेश सरचिटणीस दिनकर पाटील, शिवसेना ठाकरे गटाचे माजी महापौर विनायक पांडे, माजी महापौर यतिन वाघ, काँग्रेसचे माजी स्थायी सभापती शाहू खैरे, माजी आमदार नितीन भोसले यांना पक्षात प्रवेश देत केवळ विरोधी पक्षच नव्हे तर, शिवसेना (एकनाथ शिंदे) आणि राष्ट्रवादी (अजित पवार) मित्रपक्षांनाही धक्का दिला आहे.

# शाळांना 'जिओ टॅगिंग'साठी १० दिवसांची मुदतवाढ

## ● महास्कूल जीआयएस ॲपवर शाळांची माहिती भरणे अनिवार्य

वृत्तसंस्था । मुंबई

**'जिओ टॅगिंग' करण्याबाबत दिरंगाई होत असल्याने राज्यातील ३ हजार ७९८ शाळांचे अद्यापपर्यंत मॅपिंग झालेले नाही. याबाबत शिक्षण विभागाकडून वारंवार सूचना देऊनही विलंब होत असल्याने संबंधित शाळांना १० दिवसांमध्ये प्रक्रिया पूर्ण करण्याचे आदेश शिक्षण आयुक्त सचिंद्रप्रताप सिंह यांनी दिले.**

राज्यातील शाळांना भौतिक सुविधांसह शाळेच्या ठिकाणाचे 'जिओ टॅगिंग' करणे बंधनकारक केले आहे. त्यानुसार राज्यातील जवळपास १ लाख ४ हजार ३६७ शाळांचे मॅपिंग पूर्ण करण्यात आले आहे. तर तब्बल ३ हजार ७९८ शाळांनी जिओ टॅगिंगसंदर्भात कोणतीही प्रक्रिया पूर्ण केलेली नाही.

क्षेत्रीय कार्यालयांकडून याबाबत वारंवार पाठपुरावा करूनही काही शाळांकडून याकडे दुर्लक्ष करण्यात येत आहे, त्यामुळे प्रशासनाकडून नाराजी व्यक्त



करण्यात येत आहे. ज्या शाळांनी ही प्रक्रिया पूर्ण केलेली नाही, त्यांनी पुढील १० दिवसांमध्ये ती पूर्ण करावी, असे निर्देश शिक्षण आयुक्त सचिंद्रप्रताप सिंह यांनी दिले. प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालकांसह विभागीय शिक्षण उपसंचालक, शिक्षणाधिकारी, गटशिक्षणाधिकारी यांना परिपत्रकाद्वारे या सूचना देण्यात आल्या आहेत.

संबंधितांनी शाळांचे मॅपिंग का करण्यात आले नाही, शाळा बंद असतील तर संबंधित शिक्षणाधिकाऱ्यांनी पडताळणी करून याबाबतची माहिती ङ्ग्युडायसफ्मध्ये अद्ययावत करावी, असेही आयुक्तांनी स्पष्ट केले. मॅपिंग न केलेल्या शाळांचा अहवाल सर्व शिक्षणाधिकारी, प्रशासन अधिकारी यांनी विभागीय शिक्षण उपसंचालकांना सादर करावा. त्यानंतर प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालकांनी शिक्षण आयुक्तालयास एकत्रित अहवाल सादर करावा, असे निर्देशही शिक्षण आयुक्त सचिंद्रप्रताप सिंह यांनी दिले.

शाळांचे भौतिक ठिकाण छायाचित्रासह 'टॅग' करून सर्व सुविधांची माहिती एकत्रित करण्यासाठी महाराष्ट्र रिमोट सेन्सिग ॲप्लिकेशन सेंटर या संस्थेद्वारे 'महास्कूल जीआयएस मोबाइल ॲप्लिकेशनफ विकसित करण्यात आले आहे. त्यात 'जिओ टॅगिंग'ची प्रक्रिया पूर्ण करण्याबाबतच्या सूचना राज्यातील शाळांना एप्रिलमध्ये देण्यात आल्या होत्या. त्यानुसार राज्यातील १ लाख ४ हजार ३६७ शाळांचे मॅपिंग पूर्ण करण्यात आले असून ३ हजार ७९८ शाळांचे जिओ टॅगिंग अद्यापही शिल्लक आहे. आता उर्वरित शाळांना येत्या दहा दिवसांत याबाबतची संपूर्ण प्रक्रिया पूर्ण करावी लागणार आहे.

### माजी खासदार डॉ.हीना गावित यांचा पत्रपरिषदेत आरोप

# नंदुरबारात भाजपाचा 'वोट जिहाद'मुळेच पराभव

वृत्तसंस्था । नंदुरबार

येथील नगरपरिषदेच्या निवडणुकीत झालेला पराभव भाजपच्या जिव्हारी लागला आहे. केवळ नंदुरबारच नव्हे तर, संपूर्ण जिल्ह्यात भाजपच्या वाट्याला एकही नगरपरिषद आली नाही. नंदुरबारमध्ये लोकसभा निवडणुकीपासून गावित परिवाराविरुध्द शिवसेना शिंदे गट हा सुरु असलेला वाद नगरपरिषद निवडणुकीतही कायण राहिल्याचे दिसून आले.



निवडणुकीनंतर आता दोन्ही पक्षांमध्ये आरोप-प्रत्यारोपाचा खेळ सुरु झाला आहे.

हा 'वोट जिहाद'मुळे झाल्याचा दावा माजी खासदार डॉ हीना गावितांनी केला आहे. एका विशिष्ट समुदायाची ९५ टक्के मते शिवसेना शिंदे गटाच्या नगराध्यक्षपदाच्या उमेदवाराला मिळाल्याचे आकडेवारीवरुन दिसत असल्याने शिवसेना शिंदे गटाचा विजय हा 'वोट जिहाद'मुळे झाल्याचे हीना गावित यांनी सांगितले.

नंदुरबार नगरपरिषदेत झालेल्या पराभवानंतर माजी खासदार डॉ. हिना गावित यांनी पत्रकार परिषद घेत झालेल्या पराभवाचे विश्लेषण केले. नगरपरिषदेच्या ऐन तोंडावर भाजपचे नेते शिरीष चौधरी आणि विक्रांत मोरे हे भाजप सोडून शिवसेना शिंदे गटात शामील झाले . त्यामुळे नंदुरबार शहरात भाजप संपल्याची चर्चा होती. अशातच भाजपमधील एक गट शिवसेना शिंदे गटाशी युतीसाठी आग्रही असल्याचे दिसून आले. परंतु, सर्व शंका-कुशंकांना फाटा देत माजी खासदार डॉ. हिना गावित यांनी भाजपमध्ये पुन्हा प्रवेश करीत (पान २ वर)

## आरोग्य क्षेत्रात पीपीपी ठरु शकेल 'गेमचेंजर'

वृत्तसंस्था । अमरावती

आंध्र प्रदेशातील आरोग्य सेवा दर्जेदार उपलब्ध करून देण्यासाठी सार्वजनिक खाजगी भागीदारी (पीपीपी) मॉडेलचा अवलंब करावा, असे आवाहन केंद्रीय आरोग्य मंत्री जे.पी. नड्डा यांनी राज्य सरकारला केले आहे. आंध्र प्रदेशचे आरोग्य मंत्री सत्य कुमार यादव यांना पाठवलेल्या पत्रात नड्डा यांनी पीपीपी हे, तांत्रिक कौशल्याचा लाभ घेण्यासाठी आणि आरोग्य सेवा अधिक कार्यक्षम व सुलभ बनवण्यासाठी एक सिद्ध आणि प्रभावी यंत्रणा ठरली आहे.

# नागपुरात १.६५ कोटींचा क्रेडिट कार्ड घोटाळा

## ● बँकेच्या तत्कालीन शाखा व्यवस्थापकासह ७ जणांविरुद्ध गुन्हा

प्रतिनिधी । नागपूर

**गणेशपेठ पोलिस ठाण्याच्या हद्दीतील घाट रोडवरील युनियन बँक ऑफ इंडिया येथे क्रेडिट कार्ड व पर्सनल लोनचा १ कोटी ६५ लाख रुपयांचा घोटाळा उघडकीस आला. याप्रकरणी पोलिसांनी तत्कालीन शाखा व्यवस्थापक व चार कर्मचाऱ्यांसह सात जणांविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल केला.**

शाखा व्यवस्थापक नंदेश्वर कृष्णराव मंथापूरकर (वय ६३, शंकरपूर), विनीत ज्ञानेश्वर रोकडे (वय ४४, रा. बँक कॉलनी, नारी रोड), प्रशांत जगदीश उके (वय ४०, रा. पांढुर्णा), धीरज गजानन गजभिये (वय ५४, रा. भगवाननगर, अजनी), आशिष यशवंत जोगे (वय ३९, रा. दयालू हाऊसिंग सोसायटी, जरीपटका), दत्ता बैद्यनाथ पांचाल आणि विमल यशवंत जोगे, अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्यांची नावे आहेत. बँकेचे मुख्य व्यवस्थापक संदीप मोतीलाल कुमार (वय ४०, रा. गोदरेज आनंदम) यांनी दिलेल्या तक्रारीवरून हा गुन्हा दाखल करण्यात आला.

पोलिसांकडून प्राप्त माहितीनुसार, नंदेश्वर मंथापूरकर हे २० डिसेंबर २०१९ ते २३ मे २०२२ या कालावधीत यूनियन बँकेत शाखा व्यवस्थापक, तर विनीत ज्ञानेश्वर रोकडे, प्रशांत जगदीश उके, धीरज गजानन गजभिये तसेच आशिष यशवंत जोगे हे क्रेडिट कार्ड आणि कर्ज विभागात (पान २ वर)

# जळगावात युती झाल्यास भाजपच्या वाट्याला ४० जागा?

## गेल्यावेळी शिवसेनेचे २५ पेक्षा जास्त उमेदवार झाले होते विजयी

वृत्तसंस्था । जळगाव

**जिल्ह्यातील नगर परिषदांच्या निकालानंतर जळगाव महापालिका निवडणुकीवर महायुतीसह महाविकास आघाडीच्या घटक पक्षांनी लक्ष्य केंद्रीत केले आहे. दरम्यान, जागा वाटपावरून इतके दिवस ओढाताण करणाऱ्या महायुतीच्या तिन्ही घटक पक्षांचे उशिरा का होईना सूत जुळण्याचे संकेत मिळत आहेत. कोणत्या पक्षाला किती जागा सोडाव्यात यावर तिन्ही पक्षांची चर्चा अंतिम टप्प्यात सुद्धा आली आहे.**

जिल्ह्यातील १६ नगर परिषदांसह दोन नगर पंचायतींच्या नुकत्याच पार पडलेल्या निवडणुकांत भाजपने आठ ठिकाणी सत्ता मिळवली असून, शिवसेनेच्या शिंदे गटाने सहा ठिकाणी विजय संपादन केला आहे. नगर परिषदांच्या निवडणुका जाहीर होताच भाजपने महायुतीतील इतर घटक पक्षांना बाजूला ठेवत बहुतांश ठिकाणी स्वबळावर सत्ता स्थापन करण्याची भूमिका घेतल्याचे दिसून आले होते. या पार्श्वभूमीवर, लोकसभा व विधानसभेच्या निवडणुकांत युती टिकवली जाते, मग स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांत का नको, असा सवाल शिंदे गटाचे नेते व मंत्री गुलाबराव पाटील यांनी उपस्थित केला होता. मात्र, संपूर्ण जिल्ह्यावर आपले राजकीय वर्चस्व प्रस्थापित करण्याच्या उद्देशाने भाजपने मोजक्या ठिकाणीच शिंदे गटाशी युती केली. परिणामी, बहुतांश नगर परिषदांमध्ये भाजप आणि शिंदे गट यांच्यात थेट आणि चुरशीची लढत पाहायला मिळाली. राष्ट्रवादी (अजित पवार) काँग्रेस फार कोणाच्या गणतीत नव्हती

दरम्यान, नगर परिषदांच्या प्रत्यक्ष निकालांचा आढावा घेतला असता भाजपशी युती न करण्याचा निर्णय शिंदे गटासाठी फायदेशीर ठरल्याचे स्पष्टपणे दिसून येते. उलट, मत विभागणीमुळे भाजपला जवळपास सात ते आठ ठिकाणी पराभवाचा सामना करावा लागला असून अपेक्षेपेक्षा मोठे नुकसान सहन करावे लागले आहे. या अनुषंगाने जळगाव महापालिकेच्या आगामी निवडणुकीत ७५ पैकी ६० जागा लढवण्याच्या भूमिकेवर ठाम असलेल्या भाजपला आव्हान देण्यासाठी शिंदे गटाने आक्रमक पवित्रा घेतल्याचे दिसून येत आहे. मागील महापालिका निवडणुकीत शिवसेनेचे २५ पेक्षा अधिक नगरसेवक निवडून आले होते. सध्याच्या राजकीय परिस्थितीतही शिंदे गटाकडे किमान ३० उमेदवार निवडून येण्याची क्षमता असल्याचा दावा केला जात आहे. त्यामुळे महापालिका निवडणुकीसाठी (पान २ वर)

# यंदा गहू, हरभऱ्याचे भरघोस उत्पादन?

वृत्तसंस्था । मुंबई

**यंदा देशभरात सरासरीपेक्षा जास्त पाऊस झाल्याचा चांगला परिणाम रब्बी हंगामावर दिसून येत आहे. सिंचनासाठी पाण्याची उपलब्धता चांगली असल्यामुळे १९ डिसेंबरच्या तुलनेत रब्बी हंगामातील सरासरी लागवडीत आठ टक्क्याने वाढ होऊन, ५८०.७० लाख हेक्टरवर पेरण्या झाल्या आहेत. हरभरा लागवड उच्चांकी वाढ झाली आहे.**

रब्बी हंगामातील देशाचे क्षेत्र सरासरी ६३७.८१ लाख हेक्टर आहे. गतवर्षी ६५९.३९ लाख हेक्टरवर लागवड झाली होती. यंदा १९ डिसेंबरपर्यंत ५८०.७० लाख हेक्टरवर लागवड झाली आहे. रब्बीतील पेरण्या फेब्रुवारी अखेरपर्यंत सुरू राहतात. त्यामुळे पेरण्यांच्या अंतिम आकडेवारीत आणखी वाढ होण्याचा अंदाज आहे. १९ डिसेंबरच्या तुलनेत पेरणी क्षेत्रात आठ टक्क्यांनी वाढ झाली आहे. पाण्याची उपलब्धता चांगली असल्यामुळे सरासरीपेक्षा जास्त पेरणी होण्याचा अंदाज आहे. हरभरा, गहू, तांदूळ आणि मका लागवडीत मोठी वाढ झाली आहे. गव्हाची लागवड ३०१ लाख हेक्टर, तांदळाची लागवड १३.३५ लाख हेक्टर, कडधान्यांची १२६.७४ लाख हेक्टर, (पान २ वर)

## संपादकीय

### अनपेक्षित वळणांची निवडणूक

बृहन्मुंबई महानगरपालिकेत (बीएमसी) २२७ जागांसाठी लढत होणार असून, सुमारे ७४,४२७ कोटी रुपयांच्या बजेटची ही महापालिका राजकीयदृष्ट्या सर्व पक्षांसाठी प्रतिष्ठेची आहे. मात्र, यंदाची निवडणूक पूर्वीपेक्षा वेगळी ठरणार आहे. महायुती आणि महाविकास आघाडी या दोन प्रमुख आघाड्यांमध्ये थेट टक्कर अपेक्षित असतानाच, राष्ट्रवादी काँग्रेसमधील फूट आणि ठाकरे बंधूंची एकी यामुळे बहुरंगी लढत होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. यात 'दोन्ही पवार' म्हणजे शरद पवार आणि अजित पवार यांच्या भूमिकेचा मोठा वाटा आहे. सत्ताधारी महायुती (भाजप, एकनाथ शिंदे यांची शिवसेना आणि अजित पवार यांची राष्ट्रवादी) मुंबईत एकत्र लढण्याची घोषणा करत असली, तरी अंतर्गत वाद चव्हाट्यावर आले आहेत. भाजप आणि शिंदेसेना मुंबईत मुख्य भूमिका घेणार असून, अजित पवारांच्या राष्ट्रवादीला फारशा जागा मिळण्याची शक्यता कमी आहे. नवाब मलिक यांच्या नावाला भाजपचा विरोध असल्याने जागावाटपात अडथळे येत आहेत. अजित पवार गटाने मुंबईत ५० हून अधिक जागांची मागणी केली आहे, पण भाजपने शिंदेसेनेला २०१७ मधील ८४ जागा देण्यास नकार दिल्याने तणाव वाढला आहे. काही बातम्यांनुसार, अजित पवार मुंबईत स्वबळावर लढण्याच्या तयारीत आहेत. यामुळे महायुतीची एकी तुटली तर मुंबईत त्रिकोणी लढत निश्चित होईल. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महायुती एकत्र लढेल असं सांगितलं असलं तरी पुणे आणि पिंपरी–चिंचवडमध्ये भाजप आणि अजित पवार गट स्वतंत्र लढणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. दुसरीकडे, महाविकास आघाडी (काँग्रेस, उद्धव ठाकरे यांची शिवसेना आणि शरद पवार यांची राष्ट्रवादी) मध्येही एकजूट दिसत नाही. उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांच्या मनसेमध्ये २० वर्षांनंतर एकी झाली आहे. आपल्या राजकीय अस्तित्वासाठी ठाकरे बंधू एकत्र आले असून भाजपाच्या नेतृत्वाखालील महायुतीसमोर एक मोठे आव्हान उभे केले आहे. मुंबई महापालिकेची निवडणूक स्वबळावर लढविण्याचा निर्णय काँग्रेसने घेतला आहे. महाविकास आघाडी मुंबईत फुटली असून, ठाकरेंची शिवसेना, शरद पवारांची राष्ट्रवादी हे आघाडीत उरले आहेत. याचा अर्थ महायुती विरुद्ध महाविकास आघाडी विरुद्ध काँग्रेस अशी तिरंगी लढत मुंबईत पाहायला मिळेल. शरद पवार गट मुंबईत ठाकरे गट आणि मनसेसोबत लढण्यास इच्छुक आहे. त्यांनी २२ ते ५० जागांची मागणी केली आहे. मात्र, काँग्रेसला मनसेचा समावेश मान्य नाही. कारण, मनसेची हिंदी भाषिक विरोधी भूमिका आणि परप्रांतीयांना होणारी मारहाण यामुळे काँग्रेसने मनसेला आघाडीत घेण्यास विरोध केला होता. काँग्रेसने अल्पसंख्याक आणि दलित मतदार गमावण्याच्या भीतीने स्वबळावर लढण्याची भाषा केली आहे. काँग्रेस नेते प्रकाश आंबेडकर यांच्या वंचित बहुजन आघाडीसोबत युतीच्या चर्चा करत होते. पण नेहमीप्रमाणे या चर्चेतून काहीही निष्पन्न झाले नाही आणि शेवटी काँग्रेसने 'एकला चलो रे'ची भूमिका घेतली. यामुळे महाविकास आघाडीत फूट पडली तर विरोधकांच्या मतांचं विभाजन होऊन महायुतीला फायदा होईल. राष्ट्रवादी काँग्रेसची फूट ही मुंबई निवडणुकीत महत्त्वाची ठरणार आहे. शरद पवार गट महाविकास आघाडीत राहून ठाकरे बंधूंसोबत लढण्याची तयारी दाखवत आहे. तर अजित पवार गट महायुतीत असला तरी मुंबईत जागा न मिळाल्यास स्वतंत्र लढण्याची शक्यता आहे. पुणे आणि पिंपरी–चिंचवडमध्ये दोन्ही पवार गट एकत्र येण्याची चर्चा आहे.

# भाजपाची बंडखोरी रोखण्यासाठीच युती; शिंदे गटाचे पारडे जड

## ● जळगाव महापालिकेत भाजपची तडजोड, राष्ट्रवादी अजित पवार गट बाजूला

प्रतिनिधी । जळगाव

**महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सत्ताधारी भाजप आणि शिवसेना (शिंदे गट) यांच्यात अखेर युती जाहीर झाली आहे. राज्यात सत्तेत असलेले हे दोन पक्ष एकत्र आले असले, तरी महायुतीतील तिसरा घटक असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) यांना या युतीपासून दूर ठेवण्यात आल्याने राजकीय चर्चांना वेग आला आहे.**

■ **शिंदे गटाची भूमिका ठरू शकते निर्णायक...**

काही जागा मित्र पक्षाला सोडल्यास संयुक्त ताकदीमुळे बंडखोरीचा परिणाम मर्यादित राहील, असा भाजपचा अंदाज असल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे. युतीत शिवसेना शिंदे गटाचा मात्र स्पष्टपणे फायदा झाल्याचे दिसून येत आहे. भाजपने आपला ५७ जागांचा दावा मागे घेत कमी जागा लढवण्याची तयारी दर्शविल्याने शिंदे गटाला अपेक्षेपेक्षा अधिक जागा मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. भाजपसोबत युती केल्याने शिंदे गटाचा शहरातील राजकीय दबदबा वाढल्याचे चित्र असून, निवडणुकीत त्यांची भूमिका निर्णायक ठरू शकते, असा अंदाज राजकीय तज्ज्ञांकडून वर्तविला जात आहे.

जागावाटपाबाबत अधिकृत घोषणा अद्याप झालेली नसली, तरी या युतीमागील गणिते मात्र स्पष्ट होत चालली आहेत. महापालिका निवडणुकीत भाजपकडे मोठ्या प्रमाणात इच्छुक उमेदवारांची गर्दी झाली आहे. ७५ जागांसाठी तब्बल ५५० इच्छुकांनी अर्ज दाखल केल्याने उमेदवारी वाटप करताना पक्षनेतृत्वापुढे मोठे आव्हान उभे राहिले आहे. याच पार्श्वभूमीवर संभाव्य बंडखोरी रोखण्यासाठीच भाजपने शिवसेना शिंदे गटाशी युतीचा निर्णय घेतल्याचे राजकीय वर्तुळात बोलले जात आहे. गेल्या महापालिका निवडणुकीत भाजपने ७५ पैकी ५७ जागांवर विजय मिळवत निर्विवाद वर्चस्व प्रस्थापित केले होते. मात्र अवघ्या अडीच वर्षांत २७ नगरसेवकांनी पक्ष सोडल्याने भाजपची सत्ता कोसळली होती. त्यानंतर कालांतराने १० नगरसेवक पुन्हा पक्षात दाखल झाले. सध्या भाजपकडे ३७ विद्यमान नगरसेवक आहेत. याशिवाय शिवसेना शिंदे गटातून भाजपमध्ये आलेले नगरसेवक आणि नव्याने इच्छुक उमेदवार यांना उमेदवारी देण्याचा प्रश्नही भाजपसमोर आहे. या पार्श्वभूमीवर स्वबळावर निवडणूक लढविल्यास उमेदवारी न मिळालेल्यांकडून बंडखोरी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. हीच बंडखोरी पक्षाच्या कामगिरीवर परिणाम करू नये, यासाठी भाजपने युतीचा मार्ग स्वीकारल्याचे सांगितले जात आहे.

दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) यांना युतीबाहेर ठेवण्यामागेही स्पष्ट भूमिका दिसून येत आहे. शहरात या पक्षाची संघटनात्मक ताकद मर्यादित असल्याचा दावा भाजप व शिंदे गटाकडून केला जात आहे. युतीत राष्ट्रवादीला सामावून घ्यायचे झाल्यास दोन्ही पक्षांना आपापल्या जागांमध्ये कपात करावी लागेल, अशी भूमिका असल्याने राष्ट्रवादीला केवळ पाचच्या आसपास जागा देण्याचा पर्याय चर्चेत आहे. मात्र तशी तडजोड न झाल्यास राष्ट्रवादीला पूर्णपणे दूर ठेवण्याची तयारी असल्याचे संकेत मिळत आहेत. भाजप आणि शिवसेना शिंदे गटाची युतीच महापालिकेतील सत्तेचा किल्ला राखेल, असा विश्वास दोन्ही पक्षांच्या नेत्यांकडून व्यक्त केला जात आहे. मात्र अंतर्गत नाराजी, इच्छुकांची संख्या आणि विरोधकांची रणनीती यामुळे निवडणूक रंगतदार ठरण्याची शक्यता आहे. अखेरीस या सगळ्या राजकीय गणितांवर अंतिम निर्णय जनतेच्या मतपेटीतूनच लागणार आहे.

## दाखल्यांसाठी इच्छुकांची महापालिकेत मोठी गर्दी

जळगाव । प्रतिनिधी

महापालिका निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज विक्री आणि स्वीकारण्याची प्रक्रियेला सुरुवात झाली आहे. अर्ज दाखल करण्याची मुदत जवळ येत असल्याने निवडणुकीसाठी लागणाऱ्या दाखल्यांसाठी इच्छुक उमेदवारांची जळगाव महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीत मोठी गर्दी होत आहे.

विशेषतः महापालिकेची थकबाकी नसल्याचा दाखला, शौचालय वापराचा दाखला तसेच शासकीय ठेकेदार नसल्याचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी उमेदवारांना तासनतास प्रतीक्षा करावी लागत आहे. दुसरीकडे निवडणुकीसाठी महत्त्वाचे असलेले कर थकबाकी नसल्याचे ना-हरकत प्रमाणपत्र मिळवण्यासाठी बुधवारी पाचव्या मजल्यावरील मिळकत वसुली विभागात प्रचंड गोंधळ होता. इच्छुक उमेदवारांच्या रांगा लागल्या होत्या. निवडणूक आयोगाच्या नियमानुसार उमेदवारी अर्ज सादर करताना उमेदवाराकडे महापालिकेची कोणतीही थकबाकी नसल्याचा दाखला असणे बंधनकारक आहे. यात मालमत्ता कर, पाणीपट्टी व अन्य शुल्कांचा समावेश होतो.

## ऑल इंडिया ॲडवोकेट टूर्नामेंटमध्ये ॲड.सुरज जहांगीर सहभागी

### ● श्रीलंकेतील कोलंबा येथे सुरू आहेत स्पर्धा

प्रतिनिधी । जळगाव



**येथील ॲड.सुरज जहांगीर यांची ऑल इंडिया ॲडवोकेट टूर्नामेंटसाठी निवड झाली असून त्यात ते सहभागी झाले आहेत. बॉम्बे हायकोर्टाच्या औरंगाबाद खंडपीठाकडून प्रतिनिधित्व करण्यासाठी खानदेशातून त्यांची एकमेव निवड झाली आहे.**

श्रीलंकेतील कोलंबो येथे सुरू असलेल्या या स्पर्धेत भारतातून १६ उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालयाचे संघ या स्पर्धेत सहभागी झाले आहेत. ॲड. सुरज यांना सुप्रीम कोर्ट आणि ग्वालियर हायकोर्ट संघाकडून देखील आमंत्रित करण्यात आले आहे. त्यांच्या या कामगिरी बद्दल सर्वत्र अभिनंदन करण्यात येत आहे.

## अलायन्स चर्चमध्ये नाताळ सण साजरा

**जळगाव ।** ख्रिस्ती समाजाचा प्रमुख सण असलेला नाताळ जळगाव शहरात भक्तीमय आणि आनंदी वातावरणात साजरा करण्यात आला. पांडे डेअरी चौक येथील डॉ.ॲन्ड रेव्ह. फ्रेड विल्यम शिलैडर मेमोरियल अलायन्स चर्च, जळगाव येथे ख्रिस्ती बांधव मोठ्या उत्साहात एकत्र आले होते. दि.२५ रोजी सकाळी १० वाजता धर्मगुरू रेव्हरंट शशिकांत वळवी यांच्या उपस्थितीत नाताळच्या प्रार्थना व उपासनेस सुरुवात झाली. प्रारंभी ख्रिस्ती बांधवांनी ख्रिसमस कॅरोल्स म्हणजेच नाताळ गीते गायली.

## बसस्थानकात मोबाईल लांबविणाऱ्यास अटक

प्रतिनिधी । जळगाव

**शहरातील नवीन बसस्थानक परिसरात गर्दीचा गैरफायदा घेत तरुणीचा मोबाईल चोरणाऱ्या भामट्याला जिल्हापेठ पोलिसांनी जेरबंद करून मुद्देमाल जप्त केला आहे. त्याच्याकडून एकूण तीन मोबाईल फोन पोलिसांनी जप्त केले आहेत. हमीद अयुब खान (वय–२२, रा.मास्टर कॉलनी, जळगाव) असे अटक करण्यात आलेल्या संशयीताचे नाव आहे.**

पाचोरा येथील संपदा रविंद्र सोनवणे (वय–२४) या स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या तरुणी कॉलेजच्या कामानिमित्त दि.२३ रोजी जळगाव येथे आल्या होत्या. संध्याकाळच्या सुमारास जळगाव–चाळीसगाव बसमध्ये चढताना बसस्थानकातील गर्दीचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने त्यांच्या पर्समधील मोबाईल फोन लांबविला. या घटनेनंतर तरुणीने जिल्हापेठ पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. त्यानुसार अज्ञात चोरट्याविरोधात गुन्हा नोंदविण्यात आला होता. गुन्ह्याचा तपास सुरू असताना सहायक पोलीस निरीक्षक भारती देशमुख, पोलीस कॉन्स्टेबल राहुल पाटील व नरेंद्र दिवेकर यांनी तांत्रिक विश्लेषण व गोपनीय माहितीच्या आधारे संशयित हमीद अयुब खान यास ताब्यात घेतले. पोलिसी चौकशीत आरोपीने नवीन बसस्थानक परिसरात मोबाईल चोरी केल्याची कबुली दिली. त्याच्याकडून तरुणीचा चोरीस गेलेला मोबाईल तसेच अन्य दोन मोबाईल फोन असे एकूण तीन मोबाईल हस्तगत करण्यात आले आहेत. तरुणीचा मोबाईल चोरीस नेणारा आरोपी हाच असल्याची खात्री पोलिसांनी केली असून पुढील तपास सुरू आहे. दरम्यान, नवीन बसस्थानक परिसरात वारंवार मोबाईल चोरीच्या घटना घडत असल्याने प्रवाशांनी गर्दीच्या ठिकाणी विशेष खबरदारी घ्यावी, असे आवाहन जिल्हापेठ पोलिसांकडून करण्यात आले आहे.

## पान १ वरुन

**बांगलादेशातील हिंसाचाराकडे......**

अशी अपेक्षा करतो. मुख्य सल्लागार मोहम्मद युनूस यांच्या नेतृत्वाखालील अंतरिम सरकारच्या कार्यकाळात बांगलादेशमध्ये अल्पसंख्याकांविरुद्ध तब्बल २,९०० हून अधिक हिंसाचाराच्या घटना घडल्या असल्याची नोंद स्वतंत्र यंत्रणांनी केली आहे. अशा घटनांना केवळ माध्यमांनी केलेली अतिशयोक्ती किंवा राजकीय हिंसाचार म्हणून नाकारता येणार नाही, असेही परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी सांगितले. १२ डिसेंबर रोजी बांगलादेशमध्ये बंडखोर विद्यार्थी नेता शरीफ ओस्मान हादी याचा सिंगापूरमधील रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला. त्यानंतर बांगलादेशमध्ये हिंसाचाराची लाट उसळली.

**जळगावात युती झाल्यास......**

भाजपकडून जागा वाटपात सन्मानजनक हिस्सा मिळावा, अशी अपेक्षा शिंदे गटाकडून व्यक्त करण्यात येत आहे. त्यादृष्टीने दोन्ही पक्षाच्या नेत्यांच्या चर्चेचे गाडे पुढे देखील सरकले आहे. दुसरीकडे, राष्ट्रवादीच्या अजित पवार गटानेही युतीच्या माध्यमातून जळगाव महापालिकेची निवडणूक लढवण्याचे ठरले तर आम्हाला किमान २५ जागा मिळाव्यात, असा पवित्रा आता घेतला आहे. आमदार अनिल पाटील यांनी आपल्या पक्षाची भूमिका स्पष्ट केली आहे. अजित पवार गटाकडे निवडून येण्याची क्षमचा असणारे किमान २६ उमेदवार आहेत. त्यादृष्टीने आमचा सन्मानजनक जागांवर दावा कायम असेल. थोडेफार इकडे तिकडे होऊ शकते, असेही आमदार पाटील यांनी म्हटले आहे. त्यामुळे जळगाव महापालिकेसाठी युती झाली तरी शिंदे गटाला ३० नाही किमान २० आणि अजित पवार गटाला २५ नाही किमान १५ जागा सोडल्यास भाजपच्या वाट्याला फार तर ४० जागा येऊ शकतील, अशी परिस्थिती दिसत आहे. भाजपकडून मनपा निवडणूक लढण्यास इच्छुक असलेल्यांची मोठी संख्या लक्षात घेता जुन्या निष्ठावानांना संधी द्यावी की दुसऱ्या पक्षातून आलेल्यांना, असा प्रश्न पक्ष श्रेष्ठींना पडू शकतो. शनिवारपर्यंत युतीच्या जागा वाटपावर अंतिम तोडगा निघण्याची चिन्हे आहेत.

**महापालिका निवडणुकीत......**

ते स्वतः बोलवित आहेत आणि युतीच्या बद्दल विचारणा करत आहेत. युती झाली पाहिजे असे स्पष्ट आदेश फडणवीस यांचे आहेत. महायुती प्रचंड मतांनी विजयी होईल, असा दावा उपमुख्यमंत्री शिंदे यांनी केला. माजी महापौर मिनाक्षी शिंदे यांचा समर्थक असलेल्या शाखाप्रमुखावर पक्षातून निलंबनाची कारवाई झाल्याने मिनाक्षी शिंदे यांनी ठाणे महिला जिल्हाप्रमुख पदाचा राजीनामा दिला होता. याविषयी एकनाथ शिंदे यांना पत्रकारांनी विचारले असता, मिनाक्षी शिंदे यांच्याशी संपर्क झाला आहे. त्यांच्यासोबत चर्चा केली जाईल. हा आमच्या कुटुंबातील विषय आहे असे एकनाथ शिंदे यांनी स्पष्ट केले.

**नंदुरबारात भाजपाचा......**

शिंदे गटासमोर आव्हान निर्माण केले होते. प्रारंभी एकतर्फी वाटत असलेल्या या निवडणूकीत त्यांनी रंगत भरली होती. नंदुरबारमधील ४१ पैकी २६ ठिकाणी नवखे उमेदवार दिले. त्यांचा शिंदे गटासमोर निभाव लागला नाही. हिना गावित यांनी पत्रकार परिषदेत भाजपचा झालेला पराभव आणि शिंदे गटाचा झालेला विजय हा वोट जिहादमुळे झाल्याचा दावा केला.

**नागपुरात १.६५ कोटींचा......**

कार्यरत होते. या कालावधीत त्यांनी बनावट आधारकार्ड, पॅनकार्ड व अन्य दस्तऐवजांद्वारे ४४ क्रेडिट कार्ड तसेच पांचाल व जोगे यांना एकूण १ कोटी ६५ लाख १७ हजार रुपयांचे वितरण केले. क्रेडिट कार्ड व कर्ज देताना जोगे याने स्वतःचे बँक खाते नमूद केले. त्याआधारे त्याने पैशांची उचल केली व अन्य साथीदारांना वितरीत केले. दरम्यान नंदेश्वर निवृत्त झाले. कुमार यांनी बँकेचे ऑडिट केले असता हा घोटाळा उघडकीस आला. त्यांनी गणेशपेठ पोलिस ठाण्यात तक्रार दिली. पोलिसांनी फसवणुकीचा गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

**यंदा गहू, हरभऱ्याचे......**

हरभऱ्याची ९१.८१ लाख हेक्टरवर लागवड झाली आहे. गत काही वर्षांपासून मका लागवडीत वाढ होत आहे. रब्बी हंगामातही वाढीचा कल कायम असून, १८.३४ लाख हेक्टरवर लागवड झाली आहे. मोहरीच्या लागवडीतही वाढीचा कल आहे, सरासरीच्या तुलनेत १.२३ टक्के वाढीसह ८७.८० लाख हेक्टरवर पेरणी झाली आहे. मका वगळता रब्बी ज्वारी, बाजरी, नाचणी सारख्या तृणधान्यांच्या लागवडीत घट झाल्याचे दिसून येत आहे. डाळींमध्ये हरभऱ्याचा अपवाद वगळता मसूर, वाटाणा, कुळीथ, मूग, खेसारीच्या लागवडीत घट दिसून येत आहे. मोहरी वगळता जवस, तीळ, भुईमूग, करडई, सुर्यफुल, कारळाच्या लागवडीत घट दिसून येत आहे.

## भास्करराव पाटील, प्रमोद शिंपी यांचा भाजप प्रवेश

### ● आ.राजूमामा भोळे व मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडला सोहळा





प्रतिनिधी । जळगाव

**सामाजिक कार्यकर्ते व सेवानिवृत्त भास्करराव पाटील व शिंपी समाजाचे प्रदेश युवा अध्यक्ष प्रमोद शांताराम शिंपी यांनी बुधवार, दि.२५ रोजी भारतीय जनता पक्षात प्रवेश केला.**

भाजप कार्यालय, जी.एम. फाउंडेशन येथे हा प्रवेश सोहळा पार पडला. आ.राजूमामा भोळे व मान्यवरांच्या हस्ते प्रमोद शांताराम शिंपी व भास्करराव पाटील यांच्या गळ्यात भाजपचा गमछा टाकून त्यांचे पक्षात स्वागत करण्यात आले. याप्रसंगी भाजपचे ज्येष्ठ पदाधिकारी उदय भालेराव, माजी नगरसेवक भगत बालाणी, जिल्हा पदाधिकारी विशाल त्रिपाठी, राहुल वाघ नितीन इंगळे, जयेश भावसार, मुकुंद मेटकर यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## शिवदुर्ग महोत्सवात आज वरूण भामरे यांचे व्याख्यान

### ● किल्ले स्पर्धेचेही पारितोषिक वितरण

प्रतिनिधी । जळगाव

**येथील रोटरी क्लब ऑफ जळगाव वेस्टने आयोजित केलेल्या शिवदुर्ग महोत्सव पर्व –१ मध्ये मायादेवी नगरातील रोटरी भवन मध्ये शनिवार २७ रोजी सायंकाळी ६ वाजता किल्ले रायगडचे जतन संवर्धन करणारे वास्तु विशारद वरूण भामरे यांचे जाहीर व्याख्यान आणि किल्ले बनवा स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ आयोजित करण्यात आला आहे.**

युनोस्कोद्वारा छत्रपती शिवाजी महाराजांच्या १२ गड, कोट, किल्ल्यांना जागतिक



वारसा यादीत नामांकन घोषित झाल्याबद्दल मायादेवी नगरातील रोटरी भवनच्या प्रांगणात गड, कोट, किल्ले बनवा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत शालेय विद्यार्थ्यांनी १२ तर खुल्या गटातील स्पर्धकांनी ३ किल्ले साकारले. किल्ल्यांचे हे प्रदर्शन २७ डिसेंबरपर्यंत सर्व नागरिकांना पाहण्यासाठी खुले आहे.

## आरपीआयचे अनिल अडकमोल यांचा पहिला अर्ज दाखल

### ● भाजपकडून माझी उमेदवारी निश्चित होईल; अडकमोल यांचा विश्वास

कौस्तुभ शिंदे । जळगाव

**महानगरपालिकेच्या निवडणुकीत राजकीय वातावरण चांगलेच तापू लागले आहे. महायुतीमधील महत्त्वाचा घटक पक्ष असलेल्या रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले गटातर्फे शुक्रवार दि.२६ डिसेंबर रोजी प्रभाग क्रमांक १२ अ मधून अनिल अडकमोल यांनी आपला पहिलाच उमेदवारी अर्ज दाखल केला.**



■ **महानगरपालिका** निवडणुकीसाठी पहिल्या दिवशी ७७७, दुसऱ्या दिवशी ६१८, तिसऱ्या दिवशी दि.२६ डिसेंबर रोजी ४२४ उमेदवारी अर्जांची विक्री झाली असून आतापर्यंत १८१९ उमेदवारी अर्जांची विक्री झाली आहे. तर शुक्रवारी पहिलाच उमेदवारी अर्ज अनिल अडकमोल यांनी दाखल केला आहे. आता रणधुमाळीला रंग चढणार आहे.

निर्णय निवडणूक अधिकारी जितेंद्र कुंवर यांच्याकडे त्यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. त्यानंतर त्यांनी 'दै.शौर्य मराठी'शी संवाद साधला. यावेळी ते म्हणाले की, सन २०१४ पासून रिपाइं मित्रपक्ष भाजप सोबत काम करत आहे. लोकसभा असेल, विधानसभा असेल व इतर निवडणुकांमध्ये आम्ही मंत्री गिरीश महाजन, पालकमंत्री गुलाबराव पाटील, आ.मंगेश चव्हाण, आ.राजूमामा भोळे यांचा प्रचार केला आहे. जळगावमध्ये मागासवर्गीय समाजाला चांगलं प्रतिनिधित्व मिळावं, त्यासाठी हा उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. मुंबईमध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, आम्ही आरपीआयला भाजपच्या कोठ्यातून उमेदवारी देऊ, त्या अनुषंगाने जळगावमध्ये पाच राखीव जागांपैकी आम्ही तीन जागांची मागणी करीत आहोत. भाजपचे पदाधिकारी आम्हाला नाराज करणार नाहीत. भाजपाकडून माझी उमेदवारी ही निश्चित आहे, असा विश्वास अनिल अडकमोल यांनी व्यक्त केला. उमेदवारी अर्ज दाखल करतेवेळी आरपीआय जिल्हासचिव भरत मोरे, मिलिंद अडकमोल, प्रताप बनसोडे, नरेंद्र मोरे, रवींद्र सुरवाडे, किरण पाटील, अक्षय मोरे आदी उपस्थित होते.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक सागर काशिनाथ ओतारी व मालक रेखाबाई काशिनाथ ओतारी यांनी श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स, पी –३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगाव –४२५००१ येथे छापून शॉप नं. ई–१२, चौथा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव– ४२५००१ (महाराष्ट्र), येथे प्रसिद्ध केले.
✻ कार्यकारी संपादक – किशोर शंकर शिंपी (मोबा. – ७५८८८१३१३२) (✻ पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील) (RNI-MAHMAR/2023/89125) E-Mail : dainikshauryamarathi@gmail.com

# शिवसेना निवडणुकीच्या मैदानात

## • धुळ्यात आजी-माजींसह १७६ जणांनी दिल्या मुलाखती

प्रतिनिधी । धुळे

**महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेना शिंदेगटकडून उमेदवार निवडीची प्रक्रिया वेगाने सुरू झाली आहे. शिवसेना संपर्क प्रमुख आ. मंजुळा गावित यांच्या साक्री रोडवरील शीतल कॉलनीतील संपर्क कार्यालयात इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात आल्या.**



सकाळच्या सत्रात आयोजित बैठकीस धुळे महापालिकेच्या प्रभाग क्र.१, ४, ५, ८, ९, १०, ११, १२, १३, १४ तसेच हद्दवाढ झालेल्या परिसरातून इच्छुक उमेदवार आपल्या समर्थकांसह उत्साहात उपस्थित होते. अनेक ठिकाणी ढोल-ताशांच्या गजरात इच्छुकांचे आगमन झाले होते. या बैठकीत शिवसेना संपर्क प्रमुख आ. मंजुळा गावित यांनी आगामी निवडणुकीबाबत पक्षाची भूमिका स्पष्ट करत कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. याप्रसंगी शिवसेनेचे ज्येष्ठ नेते हिलाल माळी, जिल्हाप्रमुख सतीश महाले, मनोज मोरे, महानगरप्रमुख संजय वाल्हे आदी पदाधिकाऱ्यांनीही उपस्थितांना मार्गदर्शन करत पक्षसंघटन, प्रभागनिहाय परिस्थिती आणि निवडणुकीतील रणनीतीवर चर्चा केली. त्यानंतर इच्छुक उमेदवारांच्या वैयक्तिक मुलाखती घेण्यात आल्या. दुपारच्या सत्रात सायंकाळी ५ वाजेपासून रात्री ९ वाजेपर्यंत आजी-माजी नगरसेवकांसह एकूण १७६ इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात आल्या. इच्छुकांची मोठी संख्या, उत्साह आणि पक्षनेतृत्वाची सक्रियता पाहता धुळे महापालिकेच्या निवडणुकीत शिवसेना ताकदीने मैदानात उतरणार असल्याचे स्पष्ट संकेत या प्रक्रियेतून मिळत आहेत.

**■ यांनी दिल्या मुलाखती**

आनंद लोंढे, अरुण धुमाळ, योगेश पाटील, हिमांशु आघाव, रविंद्र माळी, सचिन बक्षी, वसिम शेख, विजय विश्वकर्मा, गणेश चौधरी, योगिता वानखेडे, अश्विनी केदार, कल्पेश चव्हाण, संजय कुसळकर, सागर ढिवरे, अनिता मोरे, सविता वाल्हे, राजू शरद चौधरी, कल्पना चित्ते, विद्या खरात, योगिता पाटील, मनोज कोळेकर, रहेमान अन्सारी, अतुल ढिवरे यांच्यासह अनेक इच्छुकांनी उमेदवारीसाठी आपली बाजू मांडली.

# शिंदखेड्यात बसचा भीषण अपघात; ३२ प्रवासी जखमी

प्रतिनिधी । शिंदखेडा

**येथील बिजासनी पेट्रोल पंपाजवळ गुरुवारी दुपारी बस-ट्रक यांच्यात अपघात झाला. या अपघातात ३२ प्रवासी जखमी झाले असून त्यात १३ जणांची प्रकृती गंभीर आहे.**



नंदुरबार आगाराची एसटी बस (क्र. एमएच २० बीएल ३५१७) नंदुरबारहून जळगावकडे जात असताना आयशर ट्रक (क्र. एम एच १८ बी जी ६१७७) धडक झाली. बसच्या पुढे चालणाऱ्या आयशर मालवाहतूक वाहनाचा वेग अचानक कमी झाल्याने मागून येणाऱ्या बसने जोरदार धडक दिली.

धडकेमुळे आयशर वाहन रस्त्यालगतच्या शेतात जाऊन थांबली. अपघाताच्या वेळी बसमध्ये एकूण ४७ प्रवासी प्रवास करत होते. यामध्ये ३२ प्रवासी जखमी झाले असून सुदैवाने एसटी बसचे चालक व वाहक दोघेही सुरक्षित आहेत. बसचे चालक जगदीश झेंडू पाटील (६१७५) तर वाहक रविंद्र युवराज पाटील (७१७) होते. अपघाताची माहिती मिळताच शिंदखेडा पोलीस स्टेशनच्या पथकाने तात्काळ घटनास्थळी धाव घेऊन परिस्थिती नियंत्रणात आणली.

जखमी प्रवाशांना त्वरित उपचारासाठी रुग्णालयात हलविण्यात आले. यावेळी डॉ. विनय पवार, डॉ. हितेंद्र पवार व पथकाने कर्तव्य बजावले. अपघात व्यवस्थापनासाठी आगार प्रमुख योगेश्वर शिवदे, वाहतूक निरीक्षक तृष्णा सोनवणे, सहाय्यक वाहतूक निरीक्षक प्रिया भामरे, स.वा.नि. राकेश पवार यांच्यासह शिंदखेडा आगाराच्या अधिकाऱ्यांनी मदतकार्य केले. शिंदखेडा पोलीस पुढील तपास करत आहेत.

## थोडक्यात

### इसाईनगर येथे नाताळनिमित्त प्रार्थना

**नंदुरबार ।** जगभरात नाताळचा सण मोठ्या उत्साहात साजरा होत असताना, नंदुरबार तालुक्यातील इसाईनगर येथे ख्रिस्ती बांधवांनी प्रभू येशू ख्रिस्ताच्या जन्मदिनानिमित्त विशेष प्रार्थना सभेचे आयोजन केले होते. या वेळी रेह. (पालक) रविकांत वळवी, विक्रम वळवी, अरमानसिंग वसावे माजी तहसीलदार, ईसाईनगर गावाचे सरपंच प्रीती वळवी, उपसरपंच वसंत वळवी, अनमोल वळवी उपस्थित होते चर्च मध्ये आलेल्या ख्रिस्ती बांधवांना प्रभू येशू ख्रिस्ताचा जन्म मानवजातीला वाचवण्यासाठी झाला. या श्रद्धेनुसार या दिवशी शांतता आणि बंधुत्वाचा संदेश देण्यात आला. यावेळी चर्चमध्ये ख्रिस्ती बांधवानी मोठी गर्दी केली होती.

### होळनांथे येथे सांस्कृतिक सोहळा

**शिरपूर ।** तालुकक्यातील होळनांथे येथील आर. सी. पटेल इंग्लिश मीडियम सीबीएसई स्कूलमध्ये अभ्युदय राइजिंग डॉन वार्षिक सांस्कृतिक सोहळ्याला उपस्थितांनी दाद दिली. या कार्यक्रमात नर्सरी ते दहावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या नृत्यनाट्य, समूह नृत्य व विविध कलाविष्कारांनी उपस्थित मान्यवरांसह प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे शिरपूर एज्युकेशन सोसायटीच्या ट्रस्टी तथा माजी नगराध्यक्षा जयश्रीबेन पटेल, ट्रस्टी कृतिबेन पटेल, एसव्हीकेएम शिरपूर कॅम्पस इन्चार्ज रिटा पटेल, ट्रस्टी अतुल भंडारी, सीईओ डॉ. उमेश शर्मा, सीए अनुप शिंपी, मुख्याध्यापिका भूमिका गर्ग, मुख्याध्यापिका मेघा मुंगसे आदी उपस्थित होते.

# मनपा निवडणुकीसाठी २८५० अधिकारी, कर्मचाऱ्यांची नियुक्ती

प्रतिनिधी । धुळे

**महापालिका सार्वत्रिक निवडणूकीच्या अनुषंगाने प्रशासकीय कार्यवाहीने वेग घेतलेला असून त्यासाठी मतदान केंद्रावर दोन हजार ८५० अधिकारी-कर्मचाऱ्यांची नियुक्ती आयुक्त तथा निवडणूक अधिकारी नितीन कापडणीस यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.**




महापालिका कार्यक्षेत्रात राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशाप्रमाणे चार सदस्यीय प्रभागात प्रत्येक प्रभागासाठी ८०० ते ९०० मतदार संख्या व तीन सदस्यीय प्रभागात ९०० ते १००० मतदारसंख्या निश्चीत करण्यात आलेली आहे. त्याअनुषंगाने एकुण ५०७मतदान केंद्र १९ प्रभागात निश्चीत करण्यात आलेली आहेत. यासाठी प्रत्येक मतदान केंद्रावर एकुण ५७० मतदान केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी एकुण १७१०, शिपाई ५७० असा अधिकारी कर्मचारी वर्ग नियुक्त करण्यात आलेला आहे. तसेच एकुण १७० मतदान केंद्रावर महिला मतदारांनी ओळख पटविण्यासाठी २०० महिला कर्मचारी नियुक्त आहेत. शहरातील दिव्यांग बांधवांना मतदान करण्यासाठी सहाय्य करण्यासाठी १५ दिव्यांग शिक्षक नियुक्त करण्यात आलेले असुन प्रत्येक मतदान केंद्रावर सहाय्यक म्हणुन आशावर्कर व केंद्रनिहाय अधिकारी नियुक्त आहेत. सदरची कार्यवाही अतिरीक्त आयुक्त करुणा डहाळे यांच्या नियंत्रणात मतदान केंद्राध्यक्ष व मतदान अधिकारी यांचे प्रशिक्षण दि.२८ डिसेंबर रोजी छत्रपती शाहु महाराज नाट्यगृह येथे ९ वाजता आयोजित करण्यात आलेले आहे. यात मतदान प्रक्रिया तसेच यंत्र हाताळणी बाबत तज्ज्ञ मार्गदर्शकमार्फत प्रशिक्षण दिले जाणार आहे. सार्वत्रिक निवडणूक कर्तव्यात गैरहजर असणाऱ्या कर्मचाऱ्यांबाबत गंभीर दखल घेण्यात येणार आहे.

# नंदुरबारच्या अभिनव विद्यालयात क्रीडा सप्ताहाचे उद्घाटन; विविध स्पर्धांमध्ये खेळाडूंचा सहभाग

प्रतिनिधी । नंदूरबार

**येथील अभिनव विद्यालयात क्रीडा सप्ताह घेण्यात आला. या सप्ताहात आयोजित विविध स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी सहभाग घेवून खेळांचे क्रीडा कौशल्य दाखविले. नंदुरबार शहरातील अभिनव विद्यालयात सन २०२५-२६ च्या क्रीडा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. या सप्ताहाचे उद्घाटन श्रॉफ हायस्कूलचे ज्येष्ठ क्रीडा शिक्षक राजेश शहा यांच्या हस्ते क्रीडा मशाल प्रज्वलनाने करण्यात आले.**



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अभिनव विद्यालयाचे मुख्याध्यापक तारकेश्वर पटेल होते. याप्रसंगी ज्येष्ठ शिक्षक हरिष जाधव, रत्ना चौधरी, वंदना पाटील आदी उपस्थित होते. तसेच राष्ट्रीय खेळाडू दक्ष चौधरी व लोकेश पाटील यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करीत क्रीडा मशाल प्रज्वलित करण्यात आली. यावेळी राजेश शहा यांनी विद्यार्थ्यांसोबत विविध फनी गेम्स खेळासंदर्भात संवाद साधला. खेळातून शिस्त, संघ भावना, सकारात्मक स्पर्धा आणि आरोग्याचे महत्त्व याविषयी विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. त्यांच्या सहभागामुळे विद्यार्थ्यांमध्ये विशेष उत्साह संचारला. अध्यक्षीय भाषणात मुख्याध्यापक तारकेश्वर पटेल यांनी विद्यार्थ्यांना शारीरिक सुदृढतेचे महत्त्व सांगत नियमित व्यायाम, खेळ व संतुलित आहार हे यशस्वी जीवनाचे आधारस्तंभ असल्याचे प्रतिपादन केले. खेळांमुळे व्यक्तीमत्त्व विकास होतो, असेही त्यांनी सांगितले. क्रीडा सप्ताहात १०० मीटर धावणे, लिंबू-चमचा शर्यत, स्लो सायकलिंग व पिरॅमिड गेम, बॅलेन्स गेम, संगीत खुर्ची आणि रस्सीखेच या फनी गेम्सच्या स्पर्धा पार पडल्या.

विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवून क्रीडा कौशल्याचे दर्शन घडविले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार रमेश मालखेडे यांनी केले. क्रीडा स्पर्धा यशस्वीतेसाठी विद्यालयातील शिक्षक व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# यशवंत विद्यालयात संत गाडगेबाबा पुण्यतिथी साजरी

प्रतिनिधी । नंदूरबार

**येथील नंदुरबार तालुका विधायक समिती संचलित यशवंत विद्यालयात स्वच्छतेचे प्रणेते संत गाडगेबाबा यांच्या पुण्यतिथीनिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य पुष्पेंद्र रघुवंशी होते. त्यांच्या हस्ते संत गाडगेबाबांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले.**



प्रमुख वक्त्या म्हणून मंगला माळी यांनी संत गाडगेबाबांच्या जीवनकार्यावर सखोल व प्रेरणादायी विचार व्यक्त केले. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य पुष्पेंद्र रघुवंशी यांनी संत गाडगेबाबांच्या कार्याचा आढावा घेतला. संत गाडगेबाबांनी आपल्या साध्या व त्यागमय जीवनातून समाजाला स्वच्छता, शिक्षण व समतेचा संदेश दिला. अंधश्रद्धा, जातीभेद व सामाजिक विषमता यांविरुद्ध त्यांनी आयुष्यभर संघर्ष केला. देव मंदिरात नाही, तर माणसात आहे, हा विचार त्यांनी केवळ सांगितला नाही, तर कृतीतून समाजासमोर साकार केला. गावो-गावी कीर्तन व भजन करताना मिळालेला पैसा त्यांनी शाळा, धर्मशाळा व रुग्णालयांच्या उभारणीसाठी खर्च केला. सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता राखण्यासाठी त्यांनी स्वच्छता अभियान राबवून समाजजागृती केली. आजच्या काळातही संत गाडगेबाबांचे विचार व कार्य समाजासाठी मार्गदर्शक व प्रेरणादायी ठरत असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.

प्रास्ताविक विशाल भट यांनी तर सूत्रसंचलन सचिन टिळंगे यांनी केले. आभार सुवर्णा अहिरराव यांनी मानले. यावेळी विद्यार्थी उपस्थित होते.

# श्रॉफ महाविद्यालयात रक्तगट तपासणी शिबीर

प्रतिनिधी । नंदुरबार

येथील श्रीमती हि.गो. श्रॉफ हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयात एच.एम. चॅरिटेबल लॅबोरेटरी यांच्या सौजन्याने रक्तगट तपासणी शिबिराचे आयोजन गटशिक्षणाधिकारी जयंत चौरे, प्राचार्य सुषमा शाह, शिक्षण विस्तार अधिकारी एस.एन. पाटील व एच.एम. मेमोरियलचे संचालक कैलास मराठे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले.



यावेळी बोलताना जयंत चौरे म्हणाले की, रक्तगट तपासणे अत्यावश्यक झाले आहे. कारण आपत्कालीन परिस्थितीत सुरक्षित रक्त संक्रमण करण्यासाठी, अवयव प्रत्यारोपण करताना लागते. चुकीच्या रक्तगटाचे रक्त दिल्यास गंभीर परिणाम होऊ शकतात.

कार्यक्रमाचे संयोजन कनिष्ठ महाविद्यालयाचे विभागप्रमुख प्रा.प्रशांत बागुल यांनी केले. सूत्रसंचलन प्रा. गणेश पाटील यांनी केले. उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. नितीन देवरे, प्रा. विमलेश बागुल, प्रा. नीलिमा पाटील, प्रा. नेहा पाटील, प्रा. कमलेश अहिरे, प्रा. विद्या थोरात, प्रा. डॉ. युवराज पाटील, प्रा. डॉ. दिनेश देवरे, प्रा. राजेंद्र माळी, प्रा. नरेंद्र गिरासे, प्रा.डॉ. जयश्री पाटील, प्रा. प्रतिभा पाटील, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# प्रत्येकाने आपले काम वेगाने, पारदर्शकपणे करण्याचा प्रयत्न करावा

## अपर जिल्हाधिकारी सुभाष बोरकर यांचे प्रतिपादन; सुशासन सप्ताह-२०२५ निमित्त पार पडली कार्यशाळा

प्रतिनिधी । धुळे

**सुशासनासाठी गतीमानता, पारदर्शकता आणि उत्तरदायित्व या तीन बाबी अत्यंत महत्त्वाच्या असून येणाऱ्या काळात प्रत्येकाने आपले काम अधिक वेगाने, पारदर्शकपणे व प्रभावीपणे करण्याचा प्रयत्न करावा, असे प्रतिपादन अपर जिल्हाधिकारी सुभाष बोरकर यांनी केले.**





जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन सभागृहात सुशासन सप्ताह-२०२५ निमित्त आयोजित कार्यशाळेत ते बोलत होते. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी शरद पवार, उपजिल्हाधिकारी (प्रशासन) संदीप पाटील, जिल्हा निवडणूक अधिकारी गंगाराम तळपाडे, जिल्हा नियोजन अधिकारी सुनील सोनार, जिल्हा परिषदेचे जिल्हा कार्यक्रम अधिकारी अजय फडोळ, राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या अधीक्षक स्वाती काकडे आदी उपस्थित होते. अपर जिल्हाधिकारी सुभाष बोरकर पुढे म्हणाले की, प्रशासनातील प्रत्येक अधिकारी व कर्मचाऱ्यांनी समन्वयाने व समर्पित भावनेने काम करून नागरिकांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध करून द्याव्यात.

धुळे जिल्ह्यात स्वच्छ, पारदर्शक व गतीमान प्रशासन सर्व स्तरांतील नागरिकांपर्यंत पोहोचवण्यासाठी सातत्याने सुधारणा करत उत्कृष्ट काम करण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी सांगितले.

धुळे जिल्हा परिषदेतील महिला व बाल विकास विभागाच्या सादरीकरणाचे कौतुक करताना त्यांनी सांगितले की, १९७० च्या दशकातील अंगणवाडी आणि आजच्या अंगणवाडीच्या स्वरूपात आमूलाग्र बदल झाला आहे. गेल्या सुमारे पन्नास वर्षांत हा बदल घडवून आणण्यासाठी अधिकारी व कर्मचाऱ्यांनी केलेले प्रयत्न उल्लेखनीय असून त्यांनी अत्यंत चांगले काम केले असल्याचे त्यांनी नमूद केले.

निवासी उपजिल्हाधिकारी शरद पवार म्हणाले की, गेल्या चार-पाच वर्षांत शासकीय कामकाज मोठ्या प्रमाणावर डिजिटल व ऑनलाईन झाले आहे. सध्या आर्टिफिशियल इंटेलिजन्सचा वापर विविध विभागांमध्ये सुरू झाला असून त्यामुळे जनतेशी अधिक सुसंवाद साधला जात आहे. महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमानुसार सध्या २०० पेक्षा अधिक सेवा विविध विभागांमार्फत दिल्या जात आहेत. तसेच दुष्काळ, अतिवृष्टी निधी व विविध अनुदाने डीबीटी प्रणालीद्वारे थेट लाभार्थ्यांना दिली जात आहेत. हा प्रवास निश्चितच सुशासनाच्या दिशेने सुरू आहे. सुशासन सप्ताहाच्या निमित्ताने सर्व स्तरांतील नागरिकांना विहित कालावधीत सेवा देण्याचा संकल्प करावा, असे त्यांनी आवाहन केले.

# आयएमए धुळे शाखेतर्फे रुग्णांना मोफत ब्लँकेट वाटप

प्रतिनिधी । धुळे

**इंडियन मेडीकल असोसिएशन धुळे शाखेतर्फे येथील जिल्हा रुग्णालय व श्री.भा.हि. वै. महाविद्यालयातील गरीब रुग्णांना १५० मोफत ब्लँकेट वाटप करण्यात आले.**

जिल्हाभरात गेल्या ४ ते ५ दिवसांपासून हुडहुडी भरणारी थंडी पडली आहे. जिल्हाभरात पारा घसरला असून ५ ते ७ अंश सेल्सियसपर्यंत तापमान खाली आलेले आहे. त्यामुळे रात्री प्रचंड थंडी असते. अशा थंड वातावरणात आरोग्याची काळजी म्हणून धुळे शहरातील वैद्यकीय सेवेतील खाजगी व सरकारी डॉक्टरांची संघटना असलेल्या इंडियन मेडीकल असोसिएशन धुळे शाखेने रुग्णांना स्व. साने गुरुजींच्या जयंतीचे औचित्य साधून १५० ब्लँकेट वाटप करण्यात आले.

या प्रसंगी इंडियन मेडीकल असोसिएशन, धुळेचे अध्यक्ष, सचिव, पदाधिकारी, सभासद उपस्थित होते. तसेच जिल्हा रुग्णालय व श्री. भा.हि. वै. महाविद्यालयातील अधिकारी, डॉक्टर्स, परिसेविका, कर्मचारी स्टाफदेखील उपस्थित होते. आरोग्य क्षेत्रातील गरीब रुग्ण ब्लँकेट वाटप करण्यासाठी इंडियन मेडीकल असोसिएशन, धुळेच्या ९० सदस्यांनी उत्स्फुर्त मदत केली.

# गोमातेचे संवर्धन म्हणजे राष्ट्रधर्मच

## ● परमपूज्य जगदीश गोपाल आनंदजी महाराजांचे अध्यात्मिक प्रतिपादन

प्रतिनिधी । चोपडा

**गोमाता ही केवळ पशू नसून सनातन हिंदू धर्माचा प्राण, संस्कृतीचे प्रतीक आणि मानवजातीसाठी करुणेचा स्रोत आहे. गोमातेचे रक्षण व संवर्धन हा केवळ धार्मिक विषय नसून तो राष्ट्रधर्माचा अविभाज्य भाग आहे, जो गोकथेचे आयोजन करतो व जो गो कथा एकतो, त्यांच्या संपूर्ण कुळाचा उद्धार होतो, असे भावपूर्ण प्रतिपादन परमपूज्य जगदीश गोपाल आनंद जी महाराज यांनी चोपडा येथे केले.**



येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या प्रशस्त आवारात भव्य गौ कृपा कथा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या अध्यात्मिक कार्यक्रमासाठी परमपूज्य साध्वी कपिला गोपाल सरस्वती जी यांचे गुरुदेव परमपूज्य जगदीश गोपाल आनंद जी महाराज यांचे चोपड्यात मंगल आगमन झाले.

यावेळी भाविकांना प्रसाद म्हणून बुंदीचे लाडू वाटप करण्यात आले. समारोपात साध्वी कपिला गोपाल सरस्वती दीदीजी यांनी गोमूत्रापासून दूर होणारे कित्येक रोगांचं निराकरण केलं. समितीचे सदस्य ज्ञानेश्वर पाटील, सतीश पाटील, नंदलाल पाटील, लखन भैया, मोरे आप्पा, देवकांत चौधरी यांनी तयार केलेल्या नव्या पुस्तकाचे प्रकाशन दीदींच्या हस्ते करण्यात आले. प्रवचनात गुरुदेवांनी गोमातेच्या आध्यात्मिक व सांस्कृतिक महत्त्वावर प्रकाश टाकला. भारतीय परंपरेत गायीला माता मानले गेले असून तिच्या अस्तित्वाशी मानवाचे आरोग्य, पर्यावरण व समाजजीवन जोडलेले आहे, असे त्यांनी सांगितले. गोपालनातून करुणा, संयम व सेवाभाव विकसित होतो. त्यामुळे गोमातेचे रक्षण हे प्रत्येक नागरिकाचे नैतिक कर्तव्य आहे, असे त्यांनी ठामपणे नमूद केले. तसेच जो गोकथेचे आयोजन करतो व जो गो कथा एकतो, त्यांच्या संपूर्ण कुळाचा उद्धार होतो,असेही परमपूज्य जगदीश गोपाल आनंद जी महाराज यांनी सांगीतले.

प्रत्येक तालुक्यातून शासनाकडे निवेदन देऊन गोमाता संरक्षणाचा संदेश पोहोचविण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. अध्यात्मिक जागृतीतूनच सामाजिक परिवर्तन घडू शकते, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. यावेळी साध्वी कपिला गोपाल दीदी यांनी राजा दिलीप यांची भावस्पर्शी कथा सांगून गोसेवेचे महत्त्व श्रोत्यांसमोर मांडले. गाईच्या सेवेने मन:शांती, सद्गुण व संततीसुख लाभते, असा मंत्रही त्यांनी उपस्थितांना दिला. कामधेनू गो सेवक समूहातर्फे साध्वी कपिला गोपाल दीदींचा वाढदिवस भक्तिभावाने साजरा करण्यात आला. कार्यक्रमास चोपडा पंचायत समितीचे माजी सभापती गोकुळ पंढरीनाथ पाटील, दादाजी दरबारचे धनराज नाना, मनीलाल पटेल, नंदलाल प्रताप पाटील यांच्यासह अनेक भाविक उपस्थित होते. सूत्रसंचालन कवी रमेश पाटील यांनी केले.

### ■ उपस्थितांनी घेतली गोहत्या बंदीची शपथ...



गौ कृपा कथा महोत्सवात साध्वी कपिला गोपाल दीदी यांनी राजा दिलीपची कथा सांगितली व गाईपासून संतान उत्पत्तीचा मंत्र देखील श्रोत्यांना दिला. कामधेनू गोसेवक समूहाने व्यासपीठावरच दीदींचा वाढदिवस साजरा केला. चोपडा पंचायत समितीचे माजी सभापती गोकुळ पंढरीनाथ पाटील, दादाजी दरबारचे धनराज नाना, मनीलाल पटेल, नंदलाल प्रताप पाटील यांनी सपत्नीक आरती केली. कथेचे सूत्रसंचालन कवी रमेश पाटील यांनी केले. यावेळी उपस्थित भाविकांनी गो हत्या बंदीची शपथ घेतली.

### ■ गोहत्या बंदीचा कायदा करावा

देशाच्या पंतप्रधानपदी २०१४ पासून नरेंद्र मोदी विराजमान झाले आहेत. त्यांनी देशात गोहत्या बंदीचा केंद्रात कायदा करायला हवा होता. परंतु २०२५ संपण्यात आला तरी गोहत्या बंदीचा कायदा झाला नाही. देशात दररोज ८० हजारांवर गायीची कत्तल होते. देशात प्रत्येक राज्यात वेगवेगळे कायदे आहेत. केंद्रात गोहत्या विरोधात कायदा लागू करून दि.२७ एप्रिल हा दिवस देशात 'गोमाता सन्मानदिन म्हणून साजरा व्हावा, असे सांगितले.

# स्काऊट गाईड शिबिरात सहकार्य, बंधुभाव, स्वावलंबनाची रुजवण

प्रतिनिधी । चोपडा

**येथील भगिनी मंडळ संचलित महिला मंडळ माध्यमिक विद्यालयाच्यावतीने स्काऊट गाईड शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. येथील समाजकार्य महाविद्यालयाच्या आवारात झालेल्या या शिबिराचे उद्घाटन म.गांधी माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक निळकंठ सोनवणे, समाजकार्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ईश्वर सौंदाणकर, उपप्राचार्य डॉ आशिष गुजराथी यांच्या हस्ते करण्यात आले.**

याप्रसंगी विद्यालयाचे मुख्याध्यापक सुनिल पाटील, पर्यवेक्षक विजय पाटील, स्काऊट गाईड समितीचे भावेश लोहार, यशोदा ठोके हे उपस्थित होते.



ध्वजारोहण व स्काऊट गाईड प्रार्थनेने शिबिराला आरंभ करण्यात आला. शिबिरादरम्यान विद्यार्थ्यांच्या अकरा गटांनी राहूट्या (तंबू) उभारून त्यांची आकर्षक सजावट केली होती. तसेच विविध सत्रांमध्ये शिबिरार्थींना देशभक्तीपर गीते, मनोरंजक गीते, कृतीयुक्त गाणी, स्काऊट गाईड चळवळीचा इतिहास, स्काऊट गाईडचे आपत्तीच्या काळातील योगदान याविषयी पंकज पाटील (शा. शि. पाटील विद्यालय, चहार्डी), राकेश विसपुते (विवेकानंद विद्यालय) यांच्यासह भावेश लोहार यांनी मार्गदर्शन केले.

शिबिरादरम्यान माजी विधानसभा अध्यक्ष अरुणभाई गुजराथी, उद्योजक आशिष गुजराथी, संस्थेच्या अध्यक्ष पूनम गुजराथी , सहसचिव अश्विनी गुजराथी, गटशिक्षणाधिकारी अजित पाटील यांनी भेट देऊन तंबूंची पाहणी केली.

# टायगर इंटरनॅशनल स्कूल येथे साने गुरुजी जयंती साजरी

प्रतिनिधी । पारोळा

टायगर इंटरनॅशनल स्कूल येथे थोर समाजसुधारक व साहित्यिक साने गुरुजी यांची जयंती अत्यंत श्रद्धा व उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या सुरुवातीला शाळेचे अध्यक्ष रविंद्र पाटील व संचालिका रूपाली पाटील यांच्या शुभहस्ते साने गुरुजींच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांच्या विचारांना आदरांजली वाहण्यात आली. याप्रसंगी प्राचार्य पी.एस. पाटील, अजीम शेख, उपप्राचार्या कविता सूर्यवंशी, विभाग प्रमुख नम्रता बेडीस्कर, वृषाली पाटील, काजल सिंधी, क्लार्क श्रीकांत खैरनार तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. यानंतर विद्यार्थ्यांनी साने गुरुजींच्या जीवनकार्यावर आधारित भाषणे, कविता व प्रेरणादायी विचार सादर केले. श्यामची आई या ग्रंथातून मिळणाऱ्या संस्कारमूल्यांचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. सत्य, सेवा, प्रेम व समाजसेवेचा संदेश या कार्यक्रमातून विद्यार्थ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचवण्यात आला.

# मुलगा झाला नाही म्हणून पोटच्या ३ दिवसांच्या मुलीची बापाने केली हत्या

प्रतिनिधी । जामनेर

**मुलाच्या हव्यासापोटी माणुसकीला काळिमा फासणारी एक अत्यंत धक्कादायक घटना जामनेर तालुक्यातील मोराड येथे घडली आहे. चौथीदेखील मुलगीच झाली या रागातून एका निर्दयी बापाने आपल्या अवघ्या तीन दिवसांच्या चिमुरडीच्या डोक्यात लाकडी पाट मारून तिची निर्घृण हत्या केली. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात संताप व्यक्त केला जात आहे.**

कृष्णा लालचंद राठोड (वय २६, रा. मोराड) असे या निर्दयी पित्याचे नाव आहे.




याला आधीच ३ मुली आहेत. चौथ्या वेळी मुलगा होईल, अशी त्याला आशा होती. मात्र, १३ नोव्हेंबर रोजी त्याच्या पत्नीने पुन्हा एका मुलीला जन्म दिला. मुलगा झाला नाही, याच रागातून कृष्णा राठोड याने २५ डिसेंबर रोजी सायंकाळी ६ वाजेच्या सुमारास रागाच्या भरात घरामध्ये असलेल्या लाकडी पाटाने ३ दिवसांच्या राधिका नावाच्या बालिकेच्या डोक्यात प्रहार केला. या गंभीर हल्ल्यात चिमुरडीचा जागीच मृत्यू झाला. या प्रकरणी पहूर पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक नंदकुमार बाळकृष्ण शिंब्रे यांनी फिर्याद दिली आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तातडीने चक्र फिरवून आरोपी पिता कृष्णा राठोड याला गुरुवारी रात्री ८:५१ वाजता अटक केली आहे. सदर प्रकरणाचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रमोद कठोरे करत आहेत. एका बापानेच आपल्या पोटच्या गोळ्याची अशा प्रकारे हत्या केल्याने समाजातील मुला-मुलींच्या भेदाची दाहकता पुन्हा एकदा समोर आली आहे.

# ब्रह्मोत्सवात 'एक शाम साई के नाम' भजन संध्यामध्ये भाविक मंत्रमुग्ध

प्रतिनिधी । पाळधी

**ब्रह्मोत्सवात रोहित राऊत आणि जुईली जोगलेकर (इंडियन आयडॉल गायक) यांच्या एक शाम साई के नाम भजन संध्या कार्यक्रमाने भाविक मंत्रमुग्ध झाले. दि.२६ रोजी महाभिषेक, महाप्रसादाने समारोप झाला.**

कार्यक्रमास ना. गिरीश महाजन, ना. गुलाबराव पाटील, जळगावचे उद्योगपती अशोकभाऊ जैन (अध्यक्ष- जैन समूह), डॉ. महेश्वर रेड्डी (पोलीस अधिक्षक) जामनेरच्या नगराध्यक्षा सौ. साधना गिरीष महाजन, प्रताप गुलाबराव पाटील (माजी जिल्हा परिषद), सदिप गावित (उपविभागिय पोलीस अधिकारी) यांनी भेट दिली. दि.२५ डिसेंबर रोजी एक शाम साई के नाम भजन रोहित राऊत आणि जुईली जोगलेकर (इंडियन आयडॉल गायक) भजना द्वारे ब्रह्मोत्सव सोहळ्याचे दुसरे पुष्प गुंफले गेले. दि. २६ रोजी अभिषेक



आणि महाप्रसाद्वारे सोहळ्याची सांगता होणार आहे. जळगाव शहरापासून जवळच असलेल्या पाळधी येथे दरवर्षी प्रमाणे आयोजित मब्रह्मोत्सवफ यावर्षी दि. २४ ते २६ डिसेंबर दरम्यान आयोजित करण्यात आला आहे. तीन दिवसीय ब्रह्मोत्सवाचे यंदा २३ वे वर्ष असून या धार्मिक उत्सवात भाविक मोठ्या संख्येने सहभागी होत आहेत. धरणगाव तालुक्यातील पाळधी येथे प्राचीन श्री सच्चिदानंद सदूरू साईबाबा, परमभक्त हनुमान आणि स्वयंभू गायल माताजी मंदिर असून त्याचा यंदा २३ वा वर्धापनदिन समारोह साजरा करण्यात येत आहे. समारोहनिमित्त यंदा देखील तीन दिवसीय मब्रह्मोत्सवफ्चे आयोजन करण्यात आले आहे. महोत्सवात तीन दिवस नाशिक येथील पंडित गयाप्रसाद चतुर्वेदी हे मंदिरात मंत्रोच्चारात महाआरती व पूजाअर्चा करत आहेत. शनिवार दि.२४ रोजी संगीतमय सुंदरकांड गुरुदेव महंत डॉ प्रज्ञा भारतीची की परमकृपा पात्र शिष्य प.पू. श्री सुश्री देवी गुंजनजी वशिष्ठ (भागवत आचार्य वृंदावन) सुंदरकांड यांनी सादर केले. यांच्या सुंदरकांडने संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणात न्हाऊन निघाला होता. हनुमानाची भगवान श्रीरामांप्रति असलेल्या आस्थेचे वर्णन करीत संगीतमय सुंदरकांड. गुरुदेव महंत डॉ प्रज्ञा भारतीची की परमकृपा पात्र शिष्य प.पू.श्री सुश्री देवी गुंजनजी वशिष्ठ (भागवत आचार्य वृंदावन) सुंदरकांड यांनी सादर केले. दि. २५ रोजी सायंकाळी ६ वाजेपासून एक शाम साई के नाम भजन यांनी रोहित राऊत आणि जुईली जोगलेकर (इंडियन आयडॉल गायक) भजना संध्याने भाविक मंत्रमुग्ध झाले. भाविकांनी तीनही दिवस मोठ्या प्रमाणात उपस्थिती देऊन भक्तिरसात न्हाऊन निघाले, असे आवाहन सुनील झंवर, मधुकर झंवर, रामचंद्र झंवर, किरण झंवर, प्रवीण झंवर, सूरज झंवर, चंद्रकांत इंदाणी, राजेंद्र इंदाणी, शरदचंद्र कासट, नितीन लढा, मनीष झंवर, राजेश दोशी, राजेश तोतला, दीपक ठक्कर, विपुल सुरतवाला, शैलेश काबरा, हितेंद्र (पप्पू) चौधरी, नरेश दोशी, सतिष अग्रवाल, कैलास मालू आदींनी केले आहे.

# ईको कार चोरीला; अज्ञातांविरोधात गुन्हा दाखल

प्रतिनिधी । भुसावळ

**शहरातील बाजारपेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीतून मारुती सुझुकी कंपनीची ग्रे रंगाची ईको कार चोरीस गेल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी अज्ञात चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

याबाबत माहिती अशी की, फिर्यादी डेनिस जोसेफ रोड्रिक्स (वय-५४, व्यवसाय ड्रायव्हर, रा.पालखी हॉटेल मागे, वरणगाव रोड, भुसावळ) यांनी पोलिसात तक्रार दाखल केली आहे. त्यांची एमएच १५



जीएफ ४४५७ क्रमांकाची ईको कार घरासमोर उभी करण्यात आली होती. २२ डिसेंबर २०२५ रोजी रात्री ११.३० वाजेपासून ते २३ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ७ वाजेदरम्यान अज्ञात चोरट्यांनी ही कार चोरून नेली. चोरीस गेलेल्या कारची अंदाजे किंमत १ लाख ५० हजार रुपये असल्याचे सांगण्यात येत आहे. या घटनेची नोंद २३ डिसेंबर २०२५ रोजी रात्री १०.३९ वाजता गुन्हा रजिस्टर क्र.५३९/२०२५ अन्वये भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम ३०३ (२) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास हेकाँ विजय नेरकर हे करीत आहेत.

अद्याप आरोपी अटक करण्यात आलेले नाहीत. दरम्यान, भुसावळ शहरात वाहनचोरीच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याने नागरिकांनी आपल्या वाहनांची योग्य खबरदारी घ्यावी, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.

# धानोरा येथे महाविष्णू याग यज्ञाचे भव्य आयोजन

## ● एप्रिल महिन्यात होणार धार्मिक सोहळा; जनार्दन हरिजी महाराजांच्या उपस्थितीत बैठक

प्रतिनिधी । धानोरा

**येथील प्राचीन आणि श्रद्धास्थान असलेल्या सतपंथ ज्योत मंदिरात सध्या गृह गाभाऱ्याचे काम अंतिम टप्प्यात असून, या पवित्र स्थळी भगवान श्री विष्णूंच्या दशावतारांच्या तसेच श्री निष्कलंकी नारायण भगवान यांच्या मूर्तींची प्राणप्रतिष्ठा होणार आहे. या मंगल प्रसंगाचे औचित्य साधून धानोरा येथे दि. १० एप्रिल ते १४ एप्रिल २०२६ या कालावधीत भव्य महाविष्णू याग यज्ञाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम चोपडा तालुक्यासह संपूर्ण परिसरासाठी ऐतिहासिक आणि आध्यात्मिक पर्वणी ठरणार आहे.**

सतपंथ ज्योत मंदिराच्या जीर्णोद्धाराच्या पार्श्वभूमीवर आयोजित करण्यात येणारा हा प्राणप्रतिष्ठा महोत्सव आणि महाविष्णू याग यज्ञ परमपूज्य



महामंडलेश्वर स्वामी जनार्दन हरीजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडणार आहे. या पाच दिवस चालणाऱ्या धार्मिक सोहळ्यासाठी भारतभरातून सुमारे ३०० संत, महंत, साधू-महात्मे धानोराच्या पावन भूमीत उपस्थित राहणार आहेत. या महाआयोजनाच्या नियोजनासाठी बुधवारी सतपंथ ज्योत मंदिरात बैठक पार पडली. बैठकीला महामंडलेश्वर स्वामी जनार्दन हरीजी महाराज उपस्थित होते. यावेळी धानोरा गावासह परिसरातील विविध समाजांचे प्रतिनिधी, भाविक, युवक, ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व समाज बांधवांनी एकत्र येऊन योगदान द्यावे, असे आवाहन स्वामीजींनी या बैठकीत केले.

महाविष्णू याग यज्ञ हा केवळ धार्मिक विधी नसून तो सामाजिक एकोपा, सांस्कृतिक परंपरा आणि आध्यात्मिक जागृतीचा महोत्सव असल्याचे स्वामी जनार्दन हरीजी महाराज यांनी स्पष्ट केले. या यज्ञामध्ये सहभागी होण्यासाठी परिसरातील भाविकांनी मुख्य यजमान म्हणून तीन दिवसांच्या यज्ञ पूजनाची सेवा घ्यावी, असे आवाहनही त्यांनी केले आहे.

# काळी मातीच्या माध्यमातून विश्वात दरवळतोय अमळनेरच्या मातीचा सुगंध

## ● अमळनेरकरांनी आपल्या लेकराचा चित्रपट आवर्जुन पाहावा; डॉ.महाले यांचे आवाहन

प्रतिनिधी । अमळनेर

**येथील सुपुत्र व हेमंतकुमार म्युझिकल्स या यू ट्युब चॅनलच्या माध्यमातून संगीत विश्वात फॉओअर्स व कोट्यवधी व्हिवरशिप ज्यांचे लाखो आहेत, असे डॉ. हेमंतकुमार महाले यांनी निर्माता व दिग्दर्शकाच्या भूमिकेतून साकार केलेला 'काळी माती' हा पहिलाच चित्रपट शुक्रवार, दि. २६ डिसेंबर रोजी अमळनेर येथील एसएस मल्टिप्लेक्स येथे सकाळी ११ वाजता प्रदर्शित झाला आहे.**

अमळनेरसह राज्यात विविध ठिकाणी 'काळी माती' हा चित्रपट झळकणार आहे. सदर चित्रपटाला एका वर्षात ४४४ सर्वोत्तम राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळाले आहेत. त्यास इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्स आणि एशिया बुक ऑफ रेकॉर्ड्सने मान्यता दिली आहे. आता सदर चित्रपटासाठी डॉ.महाले यांनी गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डकडे अर्ज केला आहे. संगीत व सिने क्षेत्राचा त्यांना कोणताही अनुभव नव्हता. कोठेही रितसर प्रशिक्षण घेतलेले नव्हते. तरीही त्यांनी या क्षेत्रात केलेली प्रगती विशेष अभिमानास्पद व अभिनंदनीय ठरते.

त्यांच्या म्युझिकल ग्रुपमध्ये मंगेशकर परिवारासह देशातील सर्वच्या सर्व दिग्गज गायक व वादकांचा समावेश राहिला आहे. अनेक उभरत्या कलाकारांना त्यांनी व्यासपीठ मिळवून दिले आहे. हेच कलावंत आज डॉ. श्री. महाले यांच्या कृपाशिर्वादाने उत्तम नावलौकिक व पैसा कमवित आहेत. सदर चित्रपट हा सत्य संघर्षावर आधारित आहे. ज्या शेतकऱ्याची ही गौरवगाथा आहे, त्याला उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना त्यांनी खास पाचारण करून त्याचा सन्मान केला होता, हे विशेष! अमळनेरकरांनी आपल्या लेकराचा हा चित्रपट आवर्जुन पाहावा, असे आवाहन डॉ. श्री. महाले यांनी अमळनेरकरांना केले आहे.



### ● कित्येक नामवंत पुरस्कारांनी सन्मानित...

डॉ.महाले गेल्या ५ दशकांहूनही अधिक काळापासून हेमंतकुमार अ‍ॅण्ड पार्टी व हेमंतकुमार म्युझिकल्स या शिर्षकांच्या माध्यमातून जगभरात गीत, संगीत व नृत्याचे शो करीत आहेत. त्यांच्या नावावर अनेक प्रतिष्ठीत रेकॉर्डस् आहेत. कित्येक नामवंत पुरसस्कारांनी ते सन्मानित आहेत. स्वत:च्या मध्यमवर्गीय परिवाराला संगीत व चित्रपटाची कोणतीही पार्श्वभूमी नसताना श्री. महाले यांनी सिने व संगीत क्षेत्रात मिळविलेली किर्ती अत्यंत कौतुकास्पद व या क्षेत्रातील अनेकांसाठी प्रेरणादायी आहे.

# राष्ट्रीय कला स्पर्धेत गौरव मिस्तरी, पुरुषोत्तम मिस्तरी देशात पाचवे

प्रतिनिधी । नगरदेवळा

**राष्ट्रीय कला उत्सव स्पर्धेत नगरदेवळा येथील सरदार एस. के. पवार माध्य व उच्च माध्यमिक विद्यालयाने राष्ट्रीय कला उत्सव स्पर्धेत देशातून पाचवा क्रमांक पटकावला आहे.**

राष्ट्रीय स्तरावरील विविध कला उत्सव स्पर्धा पुणे येथील बालेवाडी स्टेडियममध्ये दि. २० ते २३ डिसेंबर या कालावधीत संपन्न झाले. या स्पर्धांसाठी देशातील विविध राज्यातील तसेच केंद्र शासित प्रदेशातील प्रथम क्रमांक प्राप्त विद्यार्थी सहभागी झाले होते. या स्पर्धेत एस. के. पवार विद्यालयातील गौरव विनोद मिस्तरी व पुरुषोत्तम सुकदेव मिस्तरी या विद्यार्थ्यांनी देशातून पाचवा क्रमांक पटकावत विशेष प्राविण्य प्राप्त केले आहे.

कला उत्सव स्पर्धेत शिल्पकला या कलाप्रकारात पवार विद्यालयाचे विद्यार्थी महाराष्ट्राचे नेतृत्व करीत होते. त्यांनी लाकडी ट्रॅक्टर, जेसीबी, पांगुळगाडा, विटीदांडू, बाबागाडी, बळीराम नांगर व दुशर तयार केली होती. या विद्यार्थ्यांना प्रा.उमेश काटकर व प्रा.एस.एच. जोशी यांचे मार्गदर्शन लाभले. देश पातळीवर पाचवा क्रमांक मिळवल्याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.